## नि.क्र.२२ वर आदेश
(दिनांक २३.०३.२०२१)

प्रतिवादी क्रं.२ याने सदरचा अर्ज त्याला त्याचा लेखी जबाब सादर करण्याकरीता झालेला १९ दिवसाचा विलंब माफ करुन त्याचा लेखी जबाब अभिलेखावर घेण्याकरिता परवानगी मिळण्याकरीता सादर केला आहे. प्रतिवादी क्रं.२ तर्फे ॲड. श्री. व्ही. एस. शेळके यांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्रं.२ याला दाव्याचे समन्स दि.२६.११.२०२० रोजी प्राप्त झाले. कोरोनाच्या कालावधीत कार्यालय बंद असल्यामुळे त्याला सदरच्या दाव्याशी संबंधीत असलेले दस्ताऐवज मिळाले नाहीत. प्रतिवादी क्रं.२ हा कोरोनाबाधीत झाला होता. पुढे त्यांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्रं.२ याला मुदतीच्या आत त्याचा लेखी जबाब सादर करता आला नाही. प्रतिवादी क्रं.२ याला त्याचा लेखी जबाब सादर करण्याकरीता १९ दिवसाचा विलंब झालेला आहे व तो विलंब हा त्याने जाणीवपुर्वक व निष्काळजीपणे केलेला नाही. पुढे त्यांनी असा युक्तीवाद केला की, सदरचा अर्ज मंजूर झाल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु, सदरचा अर्ज नामंजूर करण्यात आला तर प्रतिवादी क्रं.२ याचे नुकसान होईल. पुढे त्यांनी अशी विनंती केली की, प्रतिवादी क्रं.२ ला त्याचा लेखी जबाब सादर करण्याकरीता झालेला १९ दिवसाचा विलंब माफ करुन त्याचा लेखी जबाब अभिलेखावर घेण्यात यावा.

२. वादीतर्फे ॲड. श्री. एस. बी. फड यांनी असा युक्तीवाद केला की,

प्रतिवादी क्रं.२ याला सदरच्या दाव्यातील समन्स दि.२६.११.२०२० रोजी प्राप्त झाल्यानंतर तो हजर झाला व त्याने वेळोवेळी लेखी जबाबाकरीता मुदत वाढवून घेतली. प्रतिवादी क्रं.२ ने त्याच्या अर्जात नमुद केलेले कारण हे चुकीचे व खोटे आहे. माहे जुन–२०२० पासून सर्व शासकीय कार्यालय सुरळीत सुरु झाले आहेत. तरी सुध्दा प्रतिवादी क्रं.२ ने त्याच्या अर्जात कार्यालय बंद असल्याबाबत खोटे कथन केले आहे. प्रतिवादी क्रं.२ हा कोरोनाबाधीत झाला होता याबाबत त्याने कोणतेही दस्ताऐवज सादर केले नाहीत. प्रतिवादी क्रं.२ हा त्याला कोरोना झाल्याबाबतचे खोटे कारण दर्शवून दिशाभुल करण्याचा प्रयत्न करीत आहे. वादीने त्याच्या दाव्यात आवश्यक ते दस्ताऐवज दाखल केलेले आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्रं.२ च्या लेखी जबाबाच्या व्यतिरिक्त सदरचा दावा निकाली काढता येवू शकतो. तसेच प्रतिवादी क्रं.२ याने सदरच्या अर्जात विलंबाचे दिलेले कारण हे खोटे आहे. पुढे त्यांनी अशी विनंती केली आहे की, सदरचा अर्ज खर्चासह खारिज करण्यात यावा.

३. सदर दाव्यातील वादपत्राचे अवलोकन केले असता सदरचा दावा हा मानहाणीच्या नुकसान भरपाईकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्रं.२ ने त्याला दाव्याचे समन्स प्राप्त झाल्यापासून विहित कालावधीत त्याचा लेखी जबाब सादर केला नाही. त्यामुळे त्याचा अर्ज नि. क्रं.२० हा खारीज करण्यात आला होता. प्रतिवादी क्रं.२ याने त्याच्या अर्जात नमूद केलेले कारण जर ग्राह्य धरून व न्यायदानाच्या दृष्टीकोनातून सदरचा अर्ज मंजूर केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. कारण सदरचा दावा हा अद्याप पुराव्याकरिता लागलेला नाही. प्रतिवादी क्रं.२ याच्या

विरुध्द अद्याप विना लेखी जबाब आदेश पारित झालेला नाही. प्रतिवादी क्रं.२ याला त्याचा लेखी जबाब सादर करण्याकरीता झालेला १९ दिवसाचा विलंब माफ करुन त्याचा लेखी जबाब अभिलेखावर घेतल्यास वादी व प्रतिवादी यांच्यात असलेला मूळ वाद हा पुराव्याच्या आधारे न्यायालयासमक्ष येईल व सदरचा दावा हा निकाली काढताना न्यायालयास मदत होईल. करिता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.२ याला त्याचा लेखी जबाब सादर करण्याकरीता झालेला १९ दिवसाचा विलंब माफ करुन त्याचा लेखी जबाब अभिलेखावर घेण्यात येतो.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

Digitally signed by Amol Ramchandra Surve
Date: 2021.03.23 17:53:33 +0530

अहमदपूर.
दिनांकः– २३.०३.२०२१.

(अ.रा. सुर्वे.)
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
अहमदपूर.